# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## जाहीर प्रकटन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाची सभा आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये, विशेषत्वाने सत्रपूर्तता/कायम नोंदणी क्रमांक (PRN) संदर्भातील विविध अधिकार मंडळाचे आदेश तसेच विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटना यांच्या मागणीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन संबंधित अधिकार मंडळास शिफारस करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना तसेच इतर शिखर संस्थांच्या मानकांनुसार प्रक्रिया पूर्ण करून त्याबाबतची सविस्तर सूचना/कार्यप्रणाली विद्यापीठ अधिकार मंडळांच्या मान्यतेने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ पूर्वी प्रसिध्द करण्याची कार्यवाही नियोजित आहे.

सदर प्रकटनाद्वारे सर्व संबंधित विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, वरील बाबीसंदर्भात आपण आपल्या महाविद्यालयाच्या मा.प्राचार्य/मा.संचालक आणि परीक्षा अधिकारी यांच्याच संपर्कात राहावे आणि विद्यापीठाच्या अधिकृत परिपत्रकाशिवाय इतर अफवा/माहिती यांना बळी पडू नये. सत्रपूर्तता/PRN संदर्भात विद्यापीठाकडे स्वत:चा डेटाबेस (विद्यार्थ्यांशी संबंधित सर्व माहिती) असून विद्यापीठाने यासाठी विद्यापीठामार्फत कोणालाही अधिकृत/प्राधिकृत केलेले नाही, याची नोंद घ्यावी.

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.परीक्षा/एस ॲण्ड टी/१७१०
दिनांक : १७/१०/२०२५

**प्रत माहितीसाठी :**

१.मा. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२.मा. प्र—कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३.मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ
४.सहायक कुलसचिव, जनसंपर्क कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे